अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. १९/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ३७८६ दि. २०/०८/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/१९/२०१९

डॉ. वैशाली जाधव
बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप.
स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड,
ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८
------------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी
तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल

डॉ. वैशाली जाधव रा. बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप, स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग,पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ०३.०६.२०१९ रोजी अर्ज करून "आरोग्य कार्यालय जा. क्र. एचओ/९५६० दि. २७.१२.२०१८ चे पत्रावर केलेल्या कार्यवाहीबाबत संपूर्ण माहिती मिळावी. सदर पत्रावर मा. महापालिका आयुक्त यांनी दिलेले आदेश, टिपण्णी, फाईल नोटिंग्ज इत्यादी बाबतच्या संपूर्ण प्रकरणाची छायांकित व साक्षांकित प्रती मिळाव्यात." बाबत माहिती मिळणे साठी अर्ज केलेला होता.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२६७९ दि. ११.०७.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ०३.०६.२०१९ | ०४.०६.२०१९ | ०३.०७.२०१९ | ११.७.२०१९ | ८ |

अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी, आस्थापना विभाग यांचे उत्तरावर अपील क्र. १९/२०१९ चा अपील अर्ज दि. २९.०७.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| २९.०७.२०१९ | २९.०७.२०१९ | ०९.०८.२०१९ | होय | - |

सदर प्रकरणी दि. १४.०८.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी डॉ. वैशाली जाधव रा. बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप, स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ या उपस्थित होत्या. श्री प्रकाश मोहिते जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी हे उपस्थित होते.

## विवेचन

अपिलार्थी डॉ. वैशाली जाधव रा. बंगला नं. A/२४, निर्मल टाऊनशिप, स.नं. ४१, काळे बोराटेनगर रोड, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ यांनी माहिती नाकारण्यात आली आहे त्याबाबत मी अपील अर्जात सविस्तर नमूद केलेले आहे असे प्रतिपादन केले. तर श्री प्रकाश मोहिते जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांचे प्रतिनिधी यांनी जा. क्र. जमाअ/आस्था/२६७९ दि. ११.०७.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिलेले आहे असे प्रतिपादन केले.

## आदेश

अपिलार्थी डॉ. वैशाली जाधव यांचे माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील मूळ अर्जावर जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी दि. ११.०७.२०१९ च्या पत्रान्वये उत्तर दिलेले असल्याने प्रथम अपील क्र. १९/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका